निवेदन

आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ०९ वा ■ सोमवार दि.२१ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – ०४

मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीचे... पान २ वर | २४ सप्टेंबर समता दिवस म्हणून... पान ३ वर | सेवा संकल्प अभियान... पान ४ वर

पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या आदेशाकडे दर्लक्ष करण्यामागे दडलंय काय?

पुणे : पुणे महापालिकेमार्फत विविध विभागाकडील विकास कामांच्या तांत्रिक गुणवत्तेबाबत उपाययोजना करण्यासंदर्भात दि.१४/८/२०२६ रोजी पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी आदेश काढले. या आदेशाचे सर्व खातेप्रमुख पुणे महानगरपालिका यांनी पालन करणे अत्यावश्यक आहे.या आदेशामध्ये मुद्दा क्र.८ मध्ये असे म्हटले आहे की, भवन विभागाकडील सर्वसाधारणपणे २० ते ४० टक्के कमी दराने निविदा प्राप्त होत आहे. याबाबत दराची तपासणी करून २० टक्के व त्यापेक्षा कमी दराने निविदा प्राप्त झाल्यास कामाचे परिमाण देखील बाधीत होण्याची शक्यता असल्याने २० टक्के व त्यापेक्षा कमी दराच्या निविदा आल्यास त्या रद्द करून नव्याने निविदा



प्रक्रिया राबविणे योग्य राहिल. असे असतानाही पुणे महापालिकेतील भवन विभागाकडून या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

ज्येष्ठ नागरिक रमेश विष्णु खामकर यांनी दि.८/९/२०२६ रोजी मा.आयुक्त, महापालिका, पुणे, मा.अति.आयुक्त(ई) महापालिका, पुणे, मा.उपआयुक्त (दक्षता) महापालिका, पुणे, मा.अधीक्षक अभियंता (भवन). पुणे महानगरपालिका यांना निविदा क्र./PMC/BHAVAN/२५/२०२६ अंतर्गत सेवकवर्ग विभागासाठी फर्निचर करणे या कामाच्या निविदेमध्ये प्राप्त झालेल्या -२९.९९% अत्यल्प दरामुळे सदर निविदा रद्द करून फेनिविदा काढण्याबाबत विनंती वजा तक्रार अर्ज दिला आहे त्यामध्ये ते म्हणतात की, सदर निविदेबाबत अत्यंत महत्वाची बाब आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. सदर सेवकवर्ग विभागासाठी फर्निचर करणे या कामाची निविदा पुणे महानगरपालिके मार्फ त प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर निविदेचा निविदा क्र.PMC/BHAVAN/२५/२०२६ असा आहे. सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या एस्टिमेटमध्ये विविध प्रकारचे फर्निचर काम तसेच वॉटरप्रुफ प्लायवूड, एमडीएफ, लॅमिनेट, मेलामाईन पॉलिश, टिकोवूड, अल्युमिनियम स्लायडिंग विंडो, फर्निचर, हार्डवेअर, स्पेशलाइज्ड चेअर, रोलर ब्लाइंड्स, डोअर, लॉक, पेंटिंग इत्यादी विविध स्पेसिफिकेशन आधारित बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर एस्टिमेटमध्ये एकूण २५ बीओक्यू आयटम्स समाविष्ट असून कामाच्या गुणवत्तेचा व टिकाऊपणा थेट संबंध या सर्व साहित्याच्या दर्जाशी व प्रत्यक्ष वर्कमॅनशिपशी आहे.

सदर निविदेच्या अधिकृत टेंडर समरीनुसार एकूण ८ निविदादारांनी सहभाग नोंदविला असून त्यापैकी ६ निविदावर टेक्निकली पात्र ठरून फायनान्शियल बिडसाठी पात्र झालेले आहेत. दिनांक ०७/०९/२०२६ रोजी फायनान्शियल बिड ओपन करण्यात आलेली असून प्राप्त बीओक्यू क्वॅरेटिव्ह चार्टनुसार निविदादारांचे दर अनुक्रमे -२१.९९%, -२१.६८%, **(पान २ वर)**

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कर्मचाऱ्यांना साहित्य वाटप करण्यासाठी निविदा क्र.Gem/२०२५/इ/६३६३९३९ सुमारे ६.५० कोटीच्या चौकशी अहवालाचे काय झाले?

वाचा पुढील अंकात

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व संस्कार वर्गाकरिता इमारत बांधून देण्याबाबत पुण्याचे उपमहापौर आणि स्थायी समिती अध्यक्ष यांना निवेदन

पुणे : सर्वे नं.६ केशवनगर येथील धम्मदायात बुध्द विहारामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व संस्कार वर्गाकरिता इमारत बांधून देण्याबाबत दि.१७ सप्टेंबर रोजी धम्मराज अशोक विचार व विकास मंचाचे अध्यक्ष दिलीप धाईंजे यांनी श्रीनाथ भिमाले, स्थायी समिती अध्यक्ष, पुणे महानगरपालिका आणि उपमहापौर परशुराम वाडेकर यांना निवेदन देण्यात आले.



धम्मराम अशोक विचार व विकास मंच संचलित धम्मदायात बुध्द विहार, केशवनगर ही संस्था गेल्या ३० वर्षांपासून सातत्याने धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहे. तसेच विविध महापुरूषांच्या जयंती व सामाजिक प्रबोधनाचे कार्यक्रम संस्थेच्या माध्यमातून नियमितपणे आयोजित केले जातात.

केशवनगर परिसरातील अनेक विद्यार्थी एमपीएसी, युपीएससी तसेच विविध स्पर्धा परीक्षा व उच्च शिक्षणाची तयारी करीत आहेत. मात्र विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी शांततामय व योग्य सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आमच्या संस्थेकडे जागा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आमच्या संस्थेकडे सेवानिवृत्त वर्ग-१ अधिकारी, शिक्षक व प्राध्यापक मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध आहेत. त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, अभ्यासिका, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व संस्कार वर्ग सुरू करण्याची आमची इच्छा आहे. परंतु यासाठी आवश्यक स्वतंत्र वर्गखोल्या व अभ्यासिकेची इमारत उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे आपण मेहरबानी करून धम्मदायात बुध्द विहार, केशवनगर येथे विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, मार्गदर्शन केंद्र व संस्कार वर्गाकरिता आवश्यक इमारत बांधून देण्यासाठी निधी मंजूर करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

तरी या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमास आपण सकारात्मक प्रतिसाद देऊन आवश्यक ती मदत व इमारत बांधकामासाठी निधी मंजूर करावा. अशी मागणी करण्यात आली आहे.

दै.महाराष्ट्र नायक वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र नायक पुरस्कार -२०२६ चे उत्साहात वितरण व पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

सा.संघर्षाचा आवाजचे संपादक संजय सोनवणे यांना डॉ.श्रीपाल सबनीस यांच्याहस्ते महाराष्ट्र नायक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले



पुणे : दै.महाराष्ट्र नायक वृत्तपत्राच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र नायक पुरस्कार-२०२६ चे वितरण अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस, डॉ. मिलिंद भोई, पुणे शहर काँग्रेस अध्यक्ष व माजी महापौर प्रशांत जगताप, वानवडी प्रभाग समिती अध्यक्ष, नगरसेवक साहिल केदारी, श्री.ह.ब.गिरमे विद्यालयाचे माजी प्राचार्य संजीव यादव व मंग या संस्कृती संसदचे अध्यक्ष अरूण चट्टोपाध्याय यांच्या प्रमुख उपस्थितीत क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी या ठिकाणी उत्साहात पार पडला.

यावेळी सा.संघर्षाचा आवाजचे संपादक संजय सोनावणे यांना पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ट, प्रामाणिक, निर्भय व समाजहिताचे वृत्तांकन केल्याबद्दल तर डॉ.गंगाधर रासगे यांना **(पान ३ वर)**

संपादकीय...

मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीचे आश्वासन : सात वर्षांनंतर शेतकऱ्याच्या बांधावर काय?

मराठवाडा म्हटले की डोळ्यासमोर येते ती दुष्काळाची छाया. पावसाचे अनिश्चित चक्र, भूजलपातळीतील घट, सिंचनाची मर्यादित साधने, पाण्यासाठी टँकरवर अवलंबून असलेली गावे आणि पावसाच्या एका मोठ्या खंडाने हातचे पीक जाण्याची भीती-ही मराठवाड्यातील शेतकऱ्यांची अनेक वर्षांची वस्तुस्थिती आहे.

याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून २०१९ मध्ये मराठवाड्यातील पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही, असा शब्द दिला होता. त्यावेळी नदीजोड, धरणे परस्पर जोडणे आणि सिंचनाचा अनुशेष भरून काढण्याच्या उपाययोजनांचा उल्लेख झाला होता. २०१९ मध्ये दिलेले हे आश्वासन आज जवळपास सात वर्षांनंतरही राजकीय भाषणांमध्ये ऐकायला मिळते. २०२४ मध्ये नांदेडमध्ये पश्चिम वाहिन्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याच्या खोऱ्यात आणून दुष्काळ कायमस्वरूपी संपवण्याची भाषा करण्यात आली. २०२५ मध्ये ५३ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्याच्या नदीजोड प्रकल्पांचा उल्लेख झाला. ऑगस्ट २०२६ मध्ये पुन्हा पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही असे सांगण्यात आले. सप्टेंबर २०२६ मध्येही कृष्णा-भीमा खोऱ्यातून ३० टीएमसी पाणी आणण्याचे आणि कोकणातून गोदावरी खोऱ्यात पाणी आणण्याच्या प्रकल्पांचा उल्लेख करण्यात आला.

मात्र प्रश्न असा आहे की या सात वर्षांत शेतकऱ्याच्या शेतातील परिस्थिती किती बदलली? २०२६ च्या खरीप हंगामातील परिस्थिती या प्रश्नाचे गांभीर्य दाखवते. जुलैच्या अखेरीस मराठवाड्यात सरासरीच्या केवळ ७७ टक्के पाऊस झाला होता आणि ८६ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली होती. म्हणजे पेरणी झाली असली तरी तिचे भवितव्य पावसाच्या पुढील स्थितीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून होते.

आता सप्टेंबरमध्ये परिस्थिती आणखी गंभीर झाल्याचे वृत्त आहे. १९ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, जून ते सप्टेंबरदरम्यान मराठवाड्यात ४२४.५ मिमी पाऊस झाला असून तो या कालावधीच्या सरासरी ६७९.५ मिमीच्या केवळ ६९.२ टक्के आहे. दीर्घ कोरड्या कालखंडामुळे आठही जिल्ह्यांतील उभ्या पिकांपैकी किमान २५ टक्के पिकांचे नुकसान झाल्याचा कृषी विभागातील अधिकाऱ्यांचा प्राथमिक अंदाज आहे. अधिकृत पंचनामे अद्याप बाकी असल्याचेही त्या अहवालात नमूद आहे. ही आकडेवारी केवळ आकडे नाहीत. त्यामागे शेतकऱ्याचे कर्ज आहे, बियाणे आहे, खताचा खर्च आहे, मजुरी आहे, डिझेलचा खर्च आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कुटुंबाचे वर्षभराचे आर्थिक गणित आहे. पाऊस पडला नाही तर पीक जाते. पीक गेले तर उत्पन्न जाते. उत्पन्न गेले तर कर्ज फेडणे कठीण होते. आणि कर्जाचा ताण वाढला की पुढील हंगामासाठी पुन्हा पैसे उभे करावे लागतात. त्यामुळे दुष्काळ हा केवळ पाण्याचा प्रश्न नाही; तो ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रश्न आहे. आज सरकारकडून मदतीची आश्वासने दिली जात आहेत. १७ सप्टेंबर २०२६ रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंचनाम्यानंतर मदत देण्याचे आश्वासन दिले. कृषी वीजबिलाच्या मोठ्या थकबाकीबाबतही निर्णयाचा उल्लेख झाला. त्याच वेळी मराठवाडा कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्यासाठी मोठ्या जलप्रकल्पांचा पाठपुरावा सुरू असल्याचे सांगण्यात आले. परंतु तात्पुरती मदत आणि कायमस्वरूपी दुष्काळमुक्ती या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. शेतकऱ्याला पंचनामा आणि नुकसानभरपाई निश्चितच आवश्यक आहे. पण दर दोन-तीन वर्षांनी नुकसानभरपाई देण्याची वेळच येऊ नये, ही खरी दुष्काळमुक्ती. शेतात पाणी उपलब्ध असणे, सूक्ष्म सिंचन वाढणे, जलसंधारण प्रभावी होणे, भूजल पुनर्भरण होणे, पिकांचे नियोजन बदलणे आणि उपलब्ध पाण्यानुसार शेतीची रचना करणे-या सगळ्यांचा एकत्रित विचार करावा लागेल.

नदीजोड किंवा मोठ्या पाणी प्रकल्पांना अनेक वर्षे लागतात. त्यामुळे घोषणा झाल्या म्हणजे दुसऱ्याच दिवशी शेतात पाणी पोहोचेल असे नाही. मात्र जनतेचा प्रश्न रास्त आहे- प्रकल्प नेमका कुठे पोहोचला? किती काम पूर्ण झाले? किती पैसा खर्च झाला? किती जमीन सिंचनाखाली आली? आणि किती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला? या प्रश्नांची उत्तरे आकडेवारीत मिळाली पाहिजेत.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

उत्तमराव सोनवणे

मागील अंकावरून

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट–भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला. **क्रमश:**

पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष...

(पान १ वरून) -२२.५८%, -१६.१०%, -२७.००%, आणि -२९.९९% असे प्राप्त झालेले आहेत.

पुणे महानगरपालिकेच्या तांत्रिक गुणवत्ता समितीमार्फत विकासकामांच्या निविदांमध्ये अत्यल्प दर प्राप्त झाल्यास अशा दरांचा कामाची गुणवत्ता, कामाचे प्रमाण, प्रत्यक्ष अंमलबजावीची व्यवहार्यता तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने विचार करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आलेली आहे. त्या पार्श्वभूमीवर सदर निविदेमध्ये प्राप्त झालेला -२९.९९% एल-१ दर हा केवळ सर्वात कमी दर आहे या कारणास्वत स्वीकारणे योग्य ठरणार नाही. सदर दरामध्ये निविदेमध्ये नमूद केलेल्या सर्व स्पेसिफिकेशन्सनुसार आवश्यक दर्जाचे साहित्य, फर्निचर हार्डवेअर, फॅब्रिकेशन, लेबर, ट्रान्सपोर्टेशन, इन्स्टॉलेशन, ओव्हरहेड्स तसेच इतर सर्व अनुषंगिक खर्च भागवून संपूर्ण काम दर्जेदार पध्दतीने पूर्ण करणे प्रत्यक्षात आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आहे किंवा नाही, याची डिटेल्ड रेट अनालिसिस करणे आवश्यक आहे.

सदर एस्टिमेटमध्ये १९ एमएम वॉटरप्रुफ, १२ एमएम वॉटरप्रुफ प्लायवूड, १२ एमएम प्लेन एमडीएफ, १ एमएम लॅमिनेट, मेलामाईन पॉलिश, टिकोवूड लेपिंग पट्टी, अल्युमिनियम स्लायडिंग विंडो, फर्निचर, लॉक, हॅडल्स, हिंजेस इत्यादी विविध साहित्याधारित बाबींचा समावेश आहे. तसेच सी-३ एम बी चेअर सारख्या विशेष स्वरूपाच्या फर्निचर आयटमचा दर २०,८२० प्रति नग आणि रोलर ब्लाइंड्सचा दर २,२६० प्रति स्क्वेअर मीटर असा नमूद आहे. त्यामुळे सदर कामामध्ये वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक साहित्याची गुणवत्ता, ब्रॅंड, ग्रेड, थिकनेस, हार्डवअरची गुणवत्ता आणि वर्कमॅनशिप यांचा विचार करता २९.९९% दरामध्ये संपूर्ण काम निविदेतील स्पेसिफिकेशननुसार पूर्ण करणे व्यवहार्य आहे का, याची गंभीरपणे तपासणी होणे आवश्यक आहे. सदर कामामध्ये प्लायवूड, लॅमिनेट, एमडीएफ व इतर फर्निचर साहित्याचा मोठ्याप्रमाणावर वापर होणार असल्याने बाजारातील साहित्याचे चालू दर, फर्निचर हार्डवेअरचे चालू दर, फॅब्रिकेशन व लेबर खर्च, ट्रान्सपोर्टेशन, इन्स्टॉलेशन तसेच वेस्टेज आणि इतर अनुषंगिक खर्च यांचा विचार करणे आवश्यक आहे. अत्यल्प दरामुळे निर्धारित स्पेसिफिकेशनमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड होऊ नये, कमी दर्जाचे साहित्य वापरले जाऊ नये अथवा भविष्यात स्पेसिफिकेशन बदलण्याची किंवा अतिरिक्त बाबींची मागणी होऊ नये, यासाठी एल-१ दराची पूर्वतपासणी करणे महानगरपालिकेच्या हिताचे राहील.

सदर एस्टिमेटमध्ये जीएसटी १,५१,९९३/- मटेरियल टेस्टिंग चार्जेस ३,९३०/- ईएमडी ८,४४१/- आणि सिक्युरिटी डिपॉझिझट ४२,२०४/- अशा आर्थिक बाबी स्वंतत्रपणे नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे एल-१ निविदादराने सादर केलेल्या अत्यल्प दराची तपासणी करताना केवळ कोटेड अमाऊंटचा विचार न करता प्रत्यक्ष मटेरियल कॉस्ट, लेबर कॉस्ट, फॅब्रिकेशन कॉस्ट, ट्रान्सपोर्टेशन, इन्स्टॉलेशन, लागू असलेले स्टॅच्युटरी ऑब्लिगेशन्स ओव्हरहेड्स आणि रिझनेबल प्रॉफिट यांचा पुरेसा समावेश सदर दरामध्ये आहे किंवा नाही. याची खातरजमा करणे आवश्यक आहे.

तसेच सदर निविदेच्या टेंडर कंडिशन्समध्ये काही प्रमुख आयटम्ससाठी मागील पाच वर्षांमध्ये कोणत्याही एका वर्षात टेंडर क्वांटिटीच्या ३०% कामाचा एक्सपिरियन्स आवश्यक असल्याचे नमूद असून त्यामध्ये प्लायवूड, लॅमिनेट व अल्युमिनियम स्लायडिंग विंडो यांसारख्या बाबींचा समावेश आहे. त्यामुळे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या निविदादाराने सादर केलेला अत्यल्प दर हा प्रत्यक्ष कामाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने व्यवहार्य आहे की, याची स्वतंत्रपणे खातरजमा करणे आवश्यक आहे.

सदर निविदेमध्ये ६ निविदादार फायनान्शियल बिडसाठी पात्र झालेले असून त्यापैकी काही निविदादारांचे दर साधारण -२१% ते -२२% या पातळीवर आहेत, तर एका निविदादाराचा दर -२७.००% आणि एल-१ निविदादाराचा दर थेट-२९.९९% इतका कमी आहे. त्यामुळे बहुसंख्य स्पर्धात्मक दरांच्या तुलनेत एन-१ दरामध्ये लक्षणीय तफावत दिसून येत आहे. अशा परिस्थितीत सदर एल-१ दराचा स्वतंत्र डिटेल्ड रेट अनालिसिस व रेट जस्टिफिकेशन घेणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या सार्वजनिक निधीची बचत ही केवळ निविदेची रक्कम कमी होण्यापुरती मर्यादित नसून निर्धारित स्पेसिफिकेशननुसार दर्जेदार, टिकाऊ आणि पूर्ण काम योग्य प्रकारे पूर्ण होणे हे देखील तितकेच महत्वाचे आहे. अत्यल्प दरामुळे जर कामाच्या गुणवत्तेमध्ये तडजोड झाली किंवा भविष्यात दुरूस्ती, पुनर्काम अथवा अतिरिक्त खर्च निर्माण झाला तर सुरूवातीस दिसणारी आर्थिक बचत प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या हिताची राहणार नाही. त्यामुळे सदर निविदेतील एल-१ दराची व्यवहार्यता तपासणे हे महानगरपालिकेच्या दीर्घकालीन आर्थिक व प्रशासकीय हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

वरल सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, निविदा क्र.PMC/BHAVAN/२५/२०२६ अंतर्गत प्राप्त झालेला -२९.९९% एल-१ दर हा २०% पेक्षा लक्षणीयरीत्या कमी असून सदर दराच्या व्यवहार्यतेबाबत सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर एल-१ निविदादाराकडून डिटेल्ड रेट अनालिसिस व रेट जस्टिफिकेशन मागणविण्यात यावे तसेच बीओक्यूमधील प्रमुख आयटम्सचे चालू बाजारभाव, मटेरियल कॉस्ट, लेबर, फॅब्रिकेशन, ट्रान्सपोर्टेशन व इन्स्टॉलेशन खर्च यांच्या आधारे स्वतंत्र तपासणी करण्यात यावी. निविदेतील सर्व स्पेसिफिकेशन्स व निर्धारित गुणवत्ता कायम ठेवून सदर -२९.९९% दरामध्ये संपूर्ण काम पूर्ण करणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसल्याचे आढळून आल्यास सदर निविदा रद्द करून सुधारित एस्टिमेट तयार करून फेरनिविदा प्रसिध्द करण्यात यावी. जेणेकरून पुणे महानगरपालिकेस पारदर्शक, स्पर्धात्मक, व्यवहार्य व गुणवत्तापूर्ण दर प्राप्त होतील.

तसेच भविष्यात फेरनिविदेमध्येही २०% पेक्षा अधिक कमी दर प्राप्त झाल्यास अशा दराची डिटेड्ड रेट अनालिसिस, टेक्निकल व्हायबिलिटी व फायनान्शियल व्हायबिलिटी तपासूनच पुढील कार्यवाही करण्यात यावी. जेणेकरून कामाची गुणवत्ता अबाधित राहून पुणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक निधीचा योग्य व परिणामकारक वापर सुनिश्चित होईल.

त्यामुळे सदर निविदेतील -२९.९९% अत्यल्प एल-१ दराचा पुनर्विचार करून सदर निविदा रद्द करावी व फेरनिविदा काढण्याबाबत आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती रमेश वि.खामकर यांनी केली आहे.

२४ सप्टेंबर 'समता दिवस' म्हणून सर्वांनी साजरा केला पाहिजे - सकल मराठी समाज





लोकशाही व्यवस्थेवर प्रचंड दृढ आस्था ठेवून हाती घेतलेल्या विषयात प्रचंड इच्छाशक्तीने स्वतःला पुर्ण झोकून देवून झगडणारे असेच एक व्यक्तीमत्व माझ्या संपर्कात आलेले होते. ते म्हणजे राजेश खडके, राजेश खडके यांचे नांव घेतले तर अनेकांना अनेक वेगवेगळ्या भूमिकांमधून त्यांचा परिचय आहे. राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, संपादक, पत्रकार, माहिती अधिकार कार्यकर्ता, आंदोलक, अनेक संघटनाचे मार्गदर्शक, इतिहास अभ्यासक, संशोधनासाठी धडपडणारे अभ्यासू, चिकित्सक अशा अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे पेलून त्यांनी आपली स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती पण माझ्या दृष्टीकोणातून त्यांची सर्वात समर्पक ओळख हि शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांवर चालणारा एक समतेचा वारकरी अशीच आहे. ते सध्या आपल्यात नाही पण त्यांनी इतिहास संशोधनातून २४ सप्टेंबरचे महत्व त्यांनी सकल मराठी समाज च्या माध्यमातून जे मांडले आहे ते जशेच्या तसेच देत आहोत. कारण आजही २४ सप्टेंबर या दिनाचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज यांचा दुसरा राज्यभिषेक आणि महात्मा जोतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता सैनिक दल यांची स्थापना केली. याची सविस्तर माहिती सांगणारे मोठ्या प्रमाणात जागृती कार्यक्रम सादर करणे आवश्यक आहे. म्हणून शिवराय, फुले, शाहु, आंबेडकर यांच्या विचारधारेवर काम करणाऱ्यांनी यापुढे तरी २४ सप्टेंबर दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात प्रबोधणात्मक कार्यक्रम घेतले पाहिजे. याची आज नित्तांत गरज आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, शंभु राजे, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या आयुष्यात समता प्रस्तापित करण्याचे कार्य केले असल्याचे आपल्यासमोर आले आहे. त्यामुळे त्यांना अभिवादन करणे आपले कर्तव्य आहे.

इतिहास साक्षीला आहे की, भगवा ध्वज समतेचे प्रतिक आहे त्यामुळे 'भगवा ध्वज विचार तर निळा ध्वज संघर्ष' असे समीकरण तयार झालेले आहे. भगवान गौतम बुध्दपूर्वी या सिंधू संस्कृतीमध्ये कोठेही भगवा ध्वज असल्याचे पुरावे सापडत नाही त्यामुळे भगव्या ध्वजाचे जनक हे भगवान गौतम बुध्द असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. याच बौध्द धर्माचे आचरण करीत सम्राट अशोकाने बौध्द राज्य निर्माण करून त्या राज्याला समतेचे निशाण म्हणून 'भगवा ध्वज' देण्यात आलेला आहे आणि हाच 'भगवा ध्वज' बौध्द साम्राज्य म्हणून सम्राट अशोक यांचा वंशज बृहरस्थ यांचे पर्यंत चालत आलेला आहे. आपल्या सर्वांना माहित आहे की, सम्राट अशोक पुत्रांनी संपूर्ण भारतभर बौध्द स्तूप, शिलालेख, लेण्या आणि विहारे उभारलेले आहे. त्यातील महाराष्ट्र राज्यातील पंढरपूर हे प्रसिध्द बौध्द विहार आहे. बौध्द धम्मातील समता टिकवून ठेवण्यासाठी याच बौध्द विहाराला समतेचे अधिष्ठान मानून संत नामदेव महाराज यांनी वारकरी सांप्रदाय स्थापन करून वारकरी यांचे हातामध्ये 'भगवा ध्वज' देऊन बौध्द साम्राज्य टिकवून ठेवण्याचे कार्य संत तुकाराम महाराज यांचे पर्यंत केलेले आहे. यालाच प्रमाण मानून स्वराज्याचं संकल्पक शहाजीराजे यांनी माता जिजाऊ यांचे मार्गदर्शनाखाली शिवरायांच्या हातामध्ये हा 'भगवा ध्वज' देऊन समतेचे राज्य निर्माण करण्यास सांगितले. शिवरायांनी समतेचे राज्य निर्माण करून स्वराज्याचे प्रतिक म्हणून हाच 'भगवा ध्वज' घेऊन २४ सप्टेंबर १६७४ मध्ये दुसरा शाक्त पंथीय राज्याभिषेक करून समतावादी स्वराज्य टिकवून ठेवण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज यांनी त्यांची राजमुद्रा पिंपळाच्या पानावर तयार करून हे समतेचे राज्य चालविले असल्याचा इतिहास साक्ष देत आहे. हे सततेचे राज्य लयास नेण्यासाठी मोगल साम्राज्याला बरोबर घेऊन ब्राह्मणी व्यवस्थेने मनुस्मृती प्रमाणे छत्रपती संभाजी महाराज यांची तुळापूर येथे हत्या करून त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे करून वढू येथे फेकून देण्यात आले.

या समतेच्या छत्रपतींचा अंत्यसंस्कार करण्यासाठी महार या गणातील वढू येथील गोविंद महार याने छत्रपतींच्या शरीराचे तुकडे गोळा करून त्यांचेवर अंत्यसंस्कार करून त्यांची समाधी वढू येथे उभारली असून ही समाधी आजही छत्रपती संभाजी महाराज समतावादी होते याची साक्ष देत आहे.

छत्रपती संभाजी महाराज यांचे हत्येनंतर कोकणातून आलेल्या चित्पावन पेशव्याने लयास नेण्यासाठी याच भगव्या ध्वजाखाली जातीय व्यवस्था निर्माण केली. समतेचे प्रतिक असलेला भगवा ध्वज जातीय प्रतिक बनविण्याचा प्रयत्न केला. परंतु सातारा गादीचे छत्रपती प्रतापसिंह भोसले यांचे सरदार भोर प्रांतातील नागेवाडी गावचे नागनाथ सेदुबीन, महार म्हणजेच सिध्दनाक ही पदवी धारण केलेले सिध्दनाक महार यांनी १८१८ मध्ये समतावादी स्वराज्याचे प्रतिक असणारा 'भगवा ध्वज' घेऊन वढू येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळी २५ हजाराची सेना गोळा करून छत्रपती संभाजी महाराज यांना मुजरा करून वढू पासून ७ कि.मी. अंतरावर असणारे भीमा कोरेगाव येथील पेशव्याचे २८ हजार सैन्याची धूळधाण करून जातीवादी पेशव्याचा अंत करून मनुस्मृती प्रमाणे झालेल्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या हत्येचा बदला घेतला आहे. याचीही भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभ साक्ष देत आहे. ब्रिटिश काळात पुरंदरचा किल्ला आपल्या ताब्यात घेऊन स्वतःचा राज्याभिषेक करून मनुवादी ब्राह्मणी व्यवस्थेच्या विरोधात लढा उभारून 'प्रतीशिवाजी' म्हणून लौकिक मिळविणारे राजे उमाजी नाईक यांनीही समतेचे भगवे निशान घेऊनच समतावादी राज्य निर्माण करण्याचे कार्य केलेले आहे. परंतु हा इतिहास लपविण्याचे कार्य इथल्या ब्राह्मणी व्यवस्थेने मोठ्या प्रमाणात केले, त्यामुळे समतेचे स्वराज्य लयास गेले.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी मामलेदार कचेरीत राजे उमाजी नाईक यांना दिलेली फाशी याचा अभ्यास करून ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समतेच्या स्वराज्यपर्यंत पोहचले आणि त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची मनुवादी व्यवस्थेने लपविली गेलेली स्वराज्याच्या रायगड किल्ल्यावरील समाधी शोधून काढून १८६९ मध्ये पहिली शिवजयंती साजरी केली. जेव्हा महात्मा फुले यांना स्वराज्याचा अभ्यास झाला तेव्हा हे स्वराज्य मनुस्मृतीच्या बळावर लयास नेले गेले असल्याची कल्पना आली तेंव्हा त्यांनी अशी घोषणा केली, ही मनुस्मृती जाळली पाहिजे. त्यानंतर पुन्हा समतेचे प्रतिक असणारा भगवा ध्वज घेऊन २४ सप्टेंबर १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा अभ्यास करून जातीय व्यवस्था समजून घेतली तेंव्हा छत्रपती शिवरायांचे राज्य समतेचे असल्याचे त्यांना जाणीव झाली. छत्रपती संभाजी महाराज समतावादी होते आणि हे समतेचे राज्य बुडविण्यासाठी इथली मनुस्मृती कारणीभूत आहे आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी सांगितल्याप्रमाणे ती दहन केली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अभ्यासाची दखल घेत कोल्हापूर गादीचे छत्रपती राजश्री शाहू महाराज यांनी स्वत: त्यांची १९२० मध्ये मुंबई येथे भेट घेतली. त्यांच्या दोघांमध्ये भरपूर चर्चा झाल्या, कोल्हापूर घराण्याबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध प्रस्थापित झाले, त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लंडनला गेले. छत्रपती

शिवाजी महाराज यांचा अश्वरूढ पुतळा शनिवार वाड्यामध्ये उभारावा अशी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची इच्छा होती. परंतु इथल्या ब्राह्मणी व्यवस्थेने त्यांना मोठ्या प्रमाणात विरोध केल्यामुळे त्यानी तो अश्वरूढ पुतळा शिवाजीनगर येथे १९२२ मध्ये उभारला आहे आणि त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूची खबर लंडन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तारेने मिळाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनमधून भारतात आल्यावर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी २४ सप्टेंबर १६७४ मध्ये केलेला दुसरा समतावादी राज्याभिषेक आणि महात्मा ज्योतिबा फुले यांचा २४ सप्टेंबर १८७३ मध्ये स्थापन केलेला सत्यशोधक समाज याच आधारावर या २४ सप्टेंबर दिनाचे औचित्य साधून २४ सप्टेंबर १९२४ मध्ये 'समता सैनिक दल' स्थापन केले. आता कोण म्हणते १९२६ ला स्थापना केली तर कोण म्हणते १९२८ ला स्थापना केली. परंतु सालामध्ये वेगवेगळी मतांतर आहेत. आमच्या अभ्यासाप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना थोर कार्य करायचे होते. त्यांना आता मुनवादी व्यवस्थेच्या विराधात मोठा संघर्ष उभारायचा होता. त्यामुळे समाजामध्ये एक संरक्षक फळी

असणे गरजेचे होते आणि या फळीला शिस्तीची जोड आवश्यक होती. या संघटनेला आचारसंहिता देणे आवश्यक होते. त्यांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विध्दवान व्यक्तिमत्व होते. त्यामुळे पुन्हा एकदा समता प्रस्थापित करायची म्हणून भगवान गौतम बुध्द आणि सम्राट अशोक यांच्या बौध्द साम्राज्यातील 'भगवा ध्वज' घेऊन 'समता सैनिक दल' यांच्या सदस्याच्या डोक्यावर निळी टोपी देऊन ३ वर्ष त्या संघटनेला आचारसंहिता दिलेली आहे. त्यामुळे १९२७ चा पहिला संघर्ष उभारीत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भीमा कोरेगाव येथील

विजयस्तंभास भेट देऊन स्वराज्याची राजधानी असलेला रायगडाच्या परिसरात महाड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा विजय असो अशा घोषणा देऊन पहिल्यांदा मनुस्मृतीचा कायदा मोडीत काढून मनुस्मृतीचे दहन केले आहे. म्हणून आपण आपल्या या महापुरूषांचा अभ्यास केल्यास आपण सर्वांनी २४ सप्टेंबर हा दिवस 'समता दिवस' साजरा करून आपल्या महापुरूषांना अभिवादन करून या दिवसाचे औचित्य साधून जास्तीत जास्त या विषयावर जनजागृती करावी तरच सर्व बहुजन समाज एकत्र व एका छताखाली येऊन गुण्यागोविंदाने राहिल.

दै.महाराष्ट्र नायक वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र नायक पुरस्कार...

(पान १ वरून) पोवाडे, भारूड, या माध्यमातून शिक्षण, इतिहास, स्वच्छता व शाश्वत शेती या विषयांवर जनजागृती केल्याबद्दल, तसेच सोहनी डांगे यांना आदिवासी पाडे, क्रांतीज्योती महिला विकास संस्थेच्या माध्यमातून महिलांसाठी व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध केल्याबद्दल आणि डॉ.राकेश कुमार भाटी यांना शिक्षण, अध्यापन, लेखन या क्षेत्रामध्ये २८ वर्षापासून अविरत परिश्रम घेतले. या उल्लेखनीय कार्यासाठी कार्य केलेल्या व्यक्तींचा महाराष्ट्र नायक २०२६ हा पुरस्कार क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले सांस्कृतिक भवन, वानवडी या ठिकाणी प्रदान करण्यात आला.

यावेळी सुप्रसिध्द लेखक, कवी व महाराष्ट्र नायक वृत्तपत्राचे संपादक अमोल वाघमारे यांच्या नवोदित कादंबरी ''सारा'' व कविता संग्रह ''अंतरंग जीवनाचे'' या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा दिमाखात पार पडला.

मा.महापौर व पुणे शहर काँग्रेस अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी यावेळी महाराष्ट्र नायक हे पत्रकारितेचे मूल्य जपणारे वृत्तपत्र असल्याचे यावेळी सांगितले.

डॉ.श्रीपाल सबनीस यांनी शेतकरी आत्महत्या, महागाई, बेरोजगारी, गरिबी, राजकारण, खैरलांजी हत्याकांड, पुतळ्यांची विटंबना, मैत्री, पैसा, जात, मन अशा सामाजिक आणि मनस्पर्शी विषयांवर प्रकाश टाकणारा कविता संग्रह हा अमोल वाघमारे यांनी लिहिला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच सारा ही कादंबरी आंतरराष्ट्रीय स्वरूपातील दर्जात्मक शैलीची रचना असल्याचे देखील मत व्यक्त केले.

तसेच सूत्रसंचालन ॲड. विशाल ओव्हाळ यांनी तर आभार प्रदर्शन ॲड.सुधीर कोंडे यांनी केले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

‘सेवा संकल्प अभियान’ लोकाभिमुख पद्धतीने राबवून पात्र नागरिकांना योजनांचा थेट लाभ द्या- जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

पुणे : ‘सेवा संकल्प अभियान’ हे केवळ विविध कार्यक्रमांच्या आयोजनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष नागरिककेंद्रित झाले पाहिजे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि सेवा पात्र नागरिकांपर्यंत सुलभपणे पोहोचवून त्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यास प्राधान्य द्यावे. अभियानातील प्रत्येक उपक्रमाचे सूक्ष्म नियोजन करून सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने आणि कालबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध सेवा सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच लोकसहभागातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले की, अभियानांतर्गत पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात ‘सेवा सेतू’ शिबिरांचे नियोजन करावे तसेच इतर सर्व विभागांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा पात्रतेनुसार लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा. ‘आपले सरकार सेवा केंद्रां’च्या माध्यमातून अर्ज प्रक्रिया पूर्ण करून शक्य त्या सेवा शिबिराच्या ठिकाणीच उपलब्ध करून द्याव्यात. तसेच छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरांचेही नियोजन करावे.

वन हक्क दाव्यांच्या अनुषंगाने ग्रामस्तरीय, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय वन हक्क समित्यांच्या बैठका घेऊन नवीन दावे तसेच पूर्वीच्या दाव्यांमधील दुरुस्तीची कार्यवाही गतिमान करावी. मंजूर वन हक्क दाव्यांनुसार अधिकार अभिलेख तयार करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. प्रलंबित दावे अभियान कालावधीत निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी निश्चित



वेळापत्रक तयार करावे, असेही त्यांनी सांगितले.

‘सेवा सेतू’ शिबिरांच्या माध्यमातून प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, जिवंत सातबारा मोहीम, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद, पाणंद रस्ते, पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र, वन हक्क दावे, मालमत्ता हस्तांतरण नोंद, नवीन नळ जोडणी, घरगुती वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, जन्म-मृत्यू नोंद व प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचतगट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ व ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासह शासन निर्णयात नमूद सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक पूर्वतयारी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले.

‘सेवा माझे योगदान’मधून लोकसहभाग वाढवा

‘सेवा माझे योगदान’ या उपक्रमातून गाव आणि वॉर्ड स्तरावर व्यापक लोकसहभाग निर्माण करावा. युवक, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह शिक्षण, कला, साहित्य, क्रीडा आणि समाजसेवा क्षेत्रातील व्यक्तींना सहभागी करून घ्यावे. स्थानिक गरजेनुसार रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, ‘स्वच्छता ही सेवा’, आरोग्य तपासणी, योग व ध्यान, प्लास्टिकमुक्ती जागृती, महिला आरोग्य व स्वच्छता, वंचित मुलांसाठी शैक्षणिक सहकार्य, करिअर समुपदेशन आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता यासारखे उपक्रम राबवावेत.

अवयवदान संकल्प अभियान, व्यसनमुक्त भारत जागृती, पोषण व निमिया जागृती, रस्ता सुरक्षा, जलसंधारण व जलस्रोत स्वच्छता, कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंग, सायबर सुरक्षा, ‘फिट इंडिया’ खेळ सत्र, वीरगाथा व सैनिकांचा सन्मान, दिव्यांगजन सहयोग, मतदार जागृती व नोंदणी, ‘व्होकल फॉर लोकल’, शासकीय योजनांची जनजागृती आणि विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासारख्या उपक्रमांचेही स्थानिक गरजेनुसार नियोजन करावे. ग्रामीण भागात गटविकास अधिकारी, तर शहरी भागात मुख्याधिकारी अथवा वॉर्ड अधिकारी नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील.

ग्रामपातळीवर लोकसहभागातून अभियान प्रभावीपणे राबवा

पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावरील यंत्रणांनी ‘सेवा संकल्प अभियान’ प्रभावीपणे राबविण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा. ‘सेवा माझे योगदान’ अंतर्गत गावागावांत स्थानिक गरजेनुसार स्वच्छता, वृक्षारोपण, आरोग्य, जलसंधारण, प्लास्टिकमुक्ती, डिजिटल साक्षरता आणि शासकीय योजनांच्या जनजागृतीचे उपक्रम लोकसहभागातून राबवावेत.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ गावातील शेवटच्या पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचविणे, ग्रामस्तरावर व्यापक लोकसहभाग निर्माण करणे आणि राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे प्रभावी दस्तऐवजीकरण करणे यावर विशेष भर द्यावा. पंचायत समिती आणि ग्रामपंचायत स्तरावरील यंत्रणेने अभियानातील उपक्रमांचे वेळापत्रक निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

‘बदलाची गोष्ट’मधून यशोगाथा संकलित करा

शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन ‘आशीर्वादाचा दिवा’ प्रज्वलित करण्याचा उपक्रम राबवावा. योजनांमुळे नागरिकांच्या जीवनमानात झालेल्या सकारात्मक बदलांच्या ‘बदलाची गोष्ट’ स्वरूपातील यशोगाथा संकलित कराव्यात. लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया नावासह व्हिडिओ स्वरूपात नोंदवून व्हिडिओ व रिल्स तयार करावेत. तालुका व जिल्हास्तरावर योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या विभागांनी प्रभावी यशोगाथा संकलित कराव्यात.

शाळा, महाविद्यालये आणि ग्रामपंचायत स्तरावर कला व नाट्य पथकांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती देणारे ‘नमो सेवागाथा’ कार्यक्रम आयोजित करावेत. स्थानिक कलाकार, विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग वाढवावा. २ ऑक्टोबर २०२६ रोजी तालुकास्तरावर कार्यक्रम आयोजित करण्याची तरतूद शासन निर्णयात करण्यात आली आहे.

‘अंगणवाडी उत्सवा’तून आरोग्य व पोषणाबाबत जनजागृती

‘अंगणवाडी उत्सव’ उपक्रमांतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांनाही सहभागी करून घ्यावे. महिलांना आरोग्य व पोषणविषयक योजनांची माहिती द्यावी. लहान मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करावेत. अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि आशा कार्यकर्त्यांचा यथोचित सन्मान करावा. लाभार्थी महिलांना शासनाच्या पोषण व आरोग्य योजनांमुळे झालेल्या लाभाचे अनुभव कथन करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

‘जल, जन आणि सेवा संकल्प यात्रे’चे सूक्ष्म नियोजन करा

पुणे जिल्ह्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या ‘जल, जन आणि सेवा संकल्प यात्रे’चे विशेष व सूक्ष्म नियोजन करावे. यात्रा जिल्ह्यातून जाणार असल्याने यात्रेचे स्वागत करण्याबरोबरच जिल्ह्यातील स्थानिक योजना आणि विकासकामांबाबत संवाद कार्यक्रम आयोजित करावा. यात्रेतील एलईडी स्क्रीनद्वारे माहितीपट दाखविण्याची व्यवस्था करावी.

यात्रेचा मार्ग, स्वागतस्थळे, कार्यक्रमस्थळे, आवश्यक सुविधा आणि विविध विभागांतील समन्वय याबाबत संबंधित यंत्रणांनी आगाऊ नियोजन करावे. अभियानातील प्रत्येक उपक्रमासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्याची कालबद्ध अंमलबजावणी करावी.

उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि दस्तऐवजीकरणावर भर

अभियानातील कार्यक्रम केवळ संख्यात्मक स्वरूपात न राबविता त्यातून नागरिकांना प्रत्यक्ष सेवा आणि योजनांचा लाभ मिळणे महत्त्वाचे आहे. विशेषतः पात्र लाभार्थ्यांची ओळख, प्रलंबित अर्जांचा निपटारा आणि शक्य त्या सेवा शिबिराच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा. अभियानाचा लाभ शेवटच्या पात्र घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले.

अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे फोटो, व्हिडिओ आणि रिल्सच्या माध्यमातून व्यवस्थित दस्तऐवजीकरण करावे. संबंधित विभागांनी आपल्या कामांचे व्हिडिओ चित्रीकरण, रिल्स व छायाचित्रे संकलित करून माहिती व जनसंपर्क यंत्रणेकडे वेळेत उपलब्ध करून द्यावीत.

अभियानातील प्रत्येक उपक्रमाची जबाबदारी संबंधित विभागांनी निश्चित करून त्याची वेळेत पूर्तता करावी. अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या योजना आणि सेवा पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच लोकसहभागातून सामाजिक उपक्रमांना चालना देऊन ‘सेवा संकल्प अभियान’ अधिक प्रभावी व नागरिकाभिमुख करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

वसुधैव कुटुंबकम’ हाच आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा पाया ‘आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय’ परिसंवादातील सर्वच तज्ज्ञ परीसंवादकांचा सूर

नाशिक : दि. १५ सप्टेंबर रोजी जगभर साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडिओवर ‘आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय’ या विषयावर ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे आयोजित हे २४ वे ज्ञानसत्र दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाले. परिसंवादातील तज्ज्ञांनी ‘वसुधैव कुटुंबकम’ ही संकल्पना आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा महत्त्वपूर्ण पाया असल्याचे प्रतिपादन केले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार या ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. महाकवी वामनदादा कर्डक



अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी ज्ञानसत्राचे समन्वयन, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

संवादात लोकशाहीची जागतिक संकल्पना, दक्षिण आशियातील लोकशाहीची वाटचाल, विविधता, नागरिकांचा सहभाग, विरोधी पक्षांची भूमिका तसेच लोकशाहीसमोरील समकालीन आव्हाने यांवर चर्चा करण्यात आली. लोकशाही ही केवळ निवडणूक प्रक्रिया नसून समानता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, संवाद, सहअस्तित्व आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित व्यापक व्यवस्था असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

प्रथम परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी ‘लोकशाहीची दक्षिण आशियाई जडणघडण : सार्क देशांची वाटचाल, विविधता आणि आव्हाने तसेच विरोधी पक्षांची भूमिका’ या विषयावर विचार मांडले. दक्षिण आशियातील विविध देशांतील लोकशाही संस्थांची वाटचाल, सामाजिक-सांस्कृतिक विविधता, नागरिकांचा सहभाग आणि विरोधी पक्षांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

द्वितीय परिसंवादक प्रा. सुजाता मोरे यांनी ‘भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता’ या विषयावर सविस्तर विवेचन केले. लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग, सार्वजनिक प्रश्नांविषयीची जागरूकता आणि नागरिकांच्या जबाबदाऱ्यांचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. पर्यटनशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक सहभागाच्या विविध पैलूंवरही त्यांनी प्रकाश टाकला.

तिसरे परिसंवादक प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी ‘अमेरिकन व भारतीय लोकशाहीचा तुलनात्मक आढावा’ घेताना दोन्ही देशांच्या लोकशाही व्यवस्थांची वैशिष्ट्ये आणि संस्थात्मक रचनेचे विवेचन केले. यानंतर त्यांनी ‘पालक लोकशाहीचे’ हे समयोचित काव्य सादर केले.

या ज्ञानसत्राचा लाभ अध्ययनार्थी, शिक्षक, संशोधक आणि नागरिकांना घेता यावा, यासाठी कार्यक्रम विद्यापीठाच्या https://avc.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यापीठाच्या दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख श्री.धनंजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक श्री.प्रकाश सापनर व श्री. गिरीश गवळी यांनी तांत्रिक सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. दीपक राजगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या ज्ञानसत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनप्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले आहे.